पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०३ । किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)
शुक्रवार २१/०८/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

## शुक्रवारी राज्यस्तरीय टेनिक्वाईट अजिंक्य स्पर्धा



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - करियर मधून खेळाच्या अनेक संधी उपलब्ध असून टेनिक्वाईट खेळामधून विद्यार्थ्यांना जास्त संधी मिळावी याकरता शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वा.सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे राज्याचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार मोहन जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि माजी आ. डॉ.सुधीर तांबे ययांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सब ज्युनिअर मुले व मुली टेनिक्वाईट अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी स्पर्धा होणार असल्याची माहिती ॲड. सुहास आहेर यांनी दिली.

या राज्यस्तरीय टेनिक्वाईट स्पर्धेच्या बाबत अधिक माहिती देताना ॲड.सुहास आहेर म्हणाले की, या खेळामध्ये गोलची रबर रिंग पलीकडच्या खेळाडूंकडे फेकून प्रतिस्पर्ध्यांना आव्हान दिले जाते. हा युरोपमध्ये खूप लोकप्रिय आहे. माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये या खेळाला जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. संगमनेर मधून अनेक नामवंत खेळाडू निर्माण झाले असून टेनिक्वाईट मधूनही खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे याकरता संगमनेर मध्ये या स्पर्धेचे आयोजन केले आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वा. मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शुभ हस्ते व राज्याचे अध्यक्ष माजी आ. मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हाध्यक्ष मा. आ. डॉ.सुधीर तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही टेनिक्वाईट अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा होणार आहे.

## पुण्यात पोलिसांचा मोठा 'ड्रग्ज' ॲक्शन

# गांजा विक्रेत्यांसह ४३ ग्राहक ताब्यात



पुणे (वृत्तसंस्था)

पुणे शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या तस्करीविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. गांजाची विक्री करणाऱ्या मुख्य तस्करांसह गांजा खरेदी करण्यासाठी आलेल्या तब्बल ४३ ग्राहकांना पोलिसांनी एकाचवेळी रंगेहात ताब्यात घेतले. विक्रेत्यांसोबतच ग्राहकांवरही अशा मोठ्या प्रमाणावर एकाच कारवाईत कारवाई झाल्याने पुणे शहरातील अमली पदार्थांच्या गैरव्यवहाराचा गंभीर चेहरा समोर आला आहे.

पुणे शहर आणि उपनगर परिसरात गांजाची बेकायदेशीर खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने संबंधित ठिकाणी बारकाईने नजर ठेवत सापळा रचला.

पोलिसांनी अचानक छापा टाकताच घटनास्थळी मोठी गर्दी आढळून आली. गांजा विक्री करणारे तस्करच नव्हे, तर गांजा खरेदी करण्यासाठी तब्बल ४३ जण तेथे दाखल झाले होते. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता विक्रेत्यांसह सर्व ग्राहकांना ताब्यात घेतले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी गांजा, रोख रक्कम तसेच अन्य संशयास्पद साहित्य जप्त केल्याची माहिती आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या सर्वांची कसून चौकशी सुरू असून, या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील कारवाईमध्ये केवळ पुरवठादार किंवा विक्रेत्यांवर कारवाई न करता गांजा खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांनाही थेट कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागल्याने अमली पदार्थांच्या साखळीत खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे ड्रग्जच्या गैरव्यवहाराला मागणीच्या माध्यमातून खतपाणी घालणाऱ्यांनाही पोलिसांचा इशारा मिळाला आहे.

या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# संगमनेरात २६ हजार मतदार घटले

### पुनर्निरीक्षणानंतर २.६३ लाख मतदारांची नोंद

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - संगमनेर तालुक्यात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेत तब्बल २६ हजार ५९३ मतदारांची घट झाल्याचे समोर आले आहे. पुनर्निरीक्षणाची प्रक्रिया १७ ऑगस्ट रोजी पूर्ण झाली असून, आता तालुक्यात २ लाख ६३ हजार १५३ मतदार नोंदविले गेले आहेत. अंतिम सुधारित मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार धीरज मांजरे यांनी दिली.

गेल्या दोन महिन्यांपासून संगमनेर तालुक्यात मतदार यादीच्या पुनर्निरीक्षणाचे काम सुरू होते. यामध्ये दुबार नोंदणी, पत्ता बदल, स्थलांतरित मतदार, छायाचित्र, आधार क्रमांक तसेच मोबाईल क्रमांक आदी बाबींची पडताळणी करण्यात आली. यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क साधत आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी केली.

मात्र, या प्रक्रियेदरम्यान अनेक मतदारांनी पुनर्निरीक्षणाकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. वारंवार पाठपुरावा करूनही काही मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे किंवा पुरावे उपलब्ध न झाल्याने त्यांच्या नोंदी कायम ठेवता आल्या नसल्याचे सांगण्यात आले. पुनर्निरीक्षणापूर्वी संगमनेर तालुक्यात २ लाख ८९ हजार ७४६ मतदार होते. यामध्ये १ लाख ४१ हजार ६२९ महिला आणि १ लाख ४८ हजार ११७ पुरुष मतदारांचा समावेश होता.

(पान २)

# एमआयडीसीच्या प्रस्तावित जागेवरील सौर प्रकल्पाला विरोध



## ११ आंदोलक ताब्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव : संगमनेर तालुक्यातील कौठे मलकापूर येथे एमआयडीसीसाठी प्रस्तावित असलेल्या जागेवर सुरू करण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामाला विरोध करण्यासाठी भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाबराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. १९) जोरदार आंदोलन करण्यात आले. शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनाला आक्रमक स्वरूप प्राप्त झाल्यानंतर घारगाव पोलिसांनी ११ आंदोलकांना ताब्यात घेत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६८ व ६९ अन्वये कारवाई केली.

कौठे मलकापूर येथे औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी जागा प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, याच जागेवर सौर ऊर्जा प्रकल्पाचे साहित्य आणून टाकण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. सौर प्रकल्पाचे काम तातडीने थांबवून जागेवरील साहित्य हटवावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनस्थळी सौर प्रकल्पाचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याने आंदोलकांचा संताप अधिकच वाढला. 'एमआयडीसी होऊ नये म्हणूनच या जागेवर सौर प्रकल्प आणला जात आहे का? या प्रकल्पामागे नेमका कोणाचा हात आहे?' असा सवाल उपस्थित करत संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात ज्येष्ठ नेते बाबासाहेब कुटे, रविंद्र दातीर, रणजित ढेरंगे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. आंदोलकांनी एमआयडीसीच्या प्रस्तावित जागेवर कोणत्याही परिस्थितीत सौर प्रकल्प उभारू देणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला.

भाजप तालुकाध्यक्ष गुलाबराजे भोसले म्हणाले, कौठे मलकापूर येथे एमआयडीसी साठी जागा प्रस्तावित आहे. या जागेवर सौर प्रकल्पाचे साहित्य टाकण्यात आले असून ते तातडीने हटविण्यात यावे. एमआयडीसीच्या प्रकल्पात कोणीही खोडा (पान २ वर)

## श्रीरामनगर परिसरात तरसाचा धुमाकूळ

# बिबट्याच्या दहशतीने नागरिकांमध्ये भिती



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

शहरालगतच्या श्रीरामनगर व अभंग मळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वावराने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असतानाच आता तरसानेही या भागात धुमाकूळ घातल्याचे समोर आले आहे. मंगळवारी (दि. १८) रात्री सुमारे १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान घरांच्या परिसरात फिरणारा तरस सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. तसेच काही तरुणांना प्रत्यक्ष तरस दिसून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

गुंजाळवाडी परिसरातून शहराच्या दिशेने वन्यप्राण्यांचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. विशेषतः महिला, लहान मुले आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही धोकादायक ठरत आहे. श्रीरामनगर, अभंग मळा परिसरात मोठ्या प्रमाणावर मोलमजुरी करणारे नागरिक वास्तव्यास आहेत. कामानिमित्त अनेक नागरिकांना रात्री उशिरापर्यंत घराबाहेर राहावे लागते. त्यामुळे बिबट्या आणि तरसासारख्या वन्यप्राण्यांचा वावर कायम राहिल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

वन्यप्राण्यांकडून नागरिकांवर हल्ला होण्याची भीती व्यक्त होत असून, एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच वन विभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807
Follow us on:

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

## दुर्गम भागातील शेतकरी आणि बचत गटांना १५ कोटी रुपयांचे कर्ज

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दुर्गम भागातील शेतकरी, महिला बचत गट तसेच कृषीपूरक उद्योगांना आर्थिक बळ देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयातर्फे अकोले येथे मेगा क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सुमारे १५ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर व वितरित करण्यात आले असून, बँकेला तब्बल ५२ कोटी रुपयांहून अधिक कर्ज प्रस्ताव प्राप्त झाले. प्रारंभी सोराबजी पोचखानवाला यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व

दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, गटविकास अधिकारी अमर माने, जिल्हा लीड मॅनेजर रितेश वाकोडे, पंकज देशमुख, अतुल पवार, उम्मेदचे कुंदन कोराडे यांच्यासह शेतकरी व महिला बचत गटांच्या सदस्या उपस्थित होत्या. नरेशकुमार दुबे यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण आणि कृषी क्षेत्राच्या विकासावर बँकेचा विशेष भर आहे.

# मुलींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य

## वाघमारेंविरोधात संताप

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - समाजातील मुलींबाबत आक्षेपार्ह व संतापजनक वक्तव्य केल्याचा आरोप करत अखंड मराठा समाज, श्रीरामपूरच्या वतीने नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला. संबंधित वक्तव्याची दखल घेऊन वाघमारे यांच्यावर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पोलिस विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

अखंड मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस निरीक्षक विशाल खैरे यांची भेट घेऊन निवेदन दिले. समाजातील मुलींबाबत करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या असून, महिला, युवक व युवतींमध्ये

संतापाची भावना निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वक्तव्याची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. कारवाई न झाल्यास अखंड मराठा समाज, श्रीरामपूरच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी योगिता लाटे, नागेश सावंत, सुरेश कांगुणे, दत्तात्रय जाधव, दिलीप थोरात, शरद नवले, सुधाकर बोंबले, कोळसे, चंद्रकांत काळे, गोकुळ मनोज होंड, ऋषिकेश मोरगे, सुनील कुताळ, रोहित भोसले, राजेंद्र भोसले, मनोज शेळके, प्रसाद खरात, सपना थेटे, गोकुळ गायकवाड, पंकज माने, सचिन कापसे आदी उपस्थित होते.

## पान १ वरून - संगमनेरात २६ हजार मतदार...

पुनर्निरीक्षणानंतर ही संख्या २ लाख ६३ हजार १५३ वर आली असून, त्यामुळे तब्बल २६ हजार ५९३ मतदार कमी झाले आहेत.दरम्यान, मतदार यादीतून नाव वगळण्यात आलेल्या नागरिकांना आपले नाव पुन्हा समाविष्ट करून घेण्याची संधी मिळणार आहे. संबंधित मतदारांनी आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर केल्यानंतर सुनावणी घेऊन पात्र असल्यास त्यांचे नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट केले जाईल. तसेच नवीन मतदारांना फॉर्म क्रमांक ६ भरून नाव नोंदणी करता येणार आहे. या प्रक्रियेनंतर अंतिम मतदार यादी ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध होणार आहे.

मतदारसंख्येत जवळपास १० टक्क्यांची घट झाल्याने राजकीय पक्षांमध्येही चिंता व्यक्त होण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांची संख्या वाढविण्यासाठी राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जातात. सध्या कोणतीही निवडणूक नसल्याने राजकीय पक्ष देखील शांत आहे. मात्र, यावेळी मोठ्या संख्येने नावे वगळली गेल्याने संबंधित मतदारांचे पुरावे गोळा करून त्यांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करण्याचे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे राहिले आहे.

**संगमनेर तालुक्यात पूर्वी २ लाख ८९ हजार ७४६ मतदार होते. पुनर्निरीक्षणाची प्रक्रिया १७ ऑगस्ट रोजी पूर्ण झाली असून, आता २ लाख ६३ हजार १५३ मतदारांची नोंद झाली आहे. २६ हजार ५९३ मतदारांची घट झाली आहे. सुधारित मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.**

\- धीरज मांजरे, **तहसीलदार, संगमनेर**

# मयत शेतकऱ्यांच्या वारसांनाही मिळणार कर्जमुक्तीचा लाभ, शासनाकडून निकष निश्चित



मुंबई (वृत्तसंस्था)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या, मात्र आधार प्रमाणीकरणापूर्वी मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अशा मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर बँकांनी वारसांची नोंद करूम सुधारित माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रक्रियेमुळे पात्र वारसांना योजनेच्या निकषांनुसार थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू केली आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन प्रणालीद्वारे केली जात असून महाआयटीमार्फत १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी १३.४८ लाख लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण सुरू आहे. पहिल्या यादीतील काही शेतकरी आधार प्रमाणीकरणापूर्वी मयत झाल्याचे बँकांच्या निदर्शनास आल्यानंतर ही सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

संबंधित कर्जदार शेतकरी मयत झाल्याची माहिती वारसाकडून प्राप्त झाल्यानंतर बँकेने आपल्या प्रचलित धोरणानुसार कर्जखात्यावर वारसांची नोंद करावी. त्यानंतर बँकेमार्फत योजनेच्या पोर्टलवर वारसांची माहिती अपलोड केली जाईल. कर्जमुक्तीचा लाभमिळण्यासाठी प्रत्येक वारसाचे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक राहणार आहे.

# संगमनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी साई दिघे तर उपाध्यक्षपदी निलेश शिंदे





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी साई दिघे, उपाध्यक्षपदी निलेश शिंदे तर सुनील राहणे यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

आठवणी आणि जीवनातील प्रत्येक क्षण कायमस्वरूपी आनंदी ठेवण्यासाठी फोटो हे अत्यंत महत्त्वाचे असतात. संगमनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे.

येथील व्यापारी असोसिएशन येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सुरुवातीला पद्मश्री रघुवीर खेडकर आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डी. बी. राठी सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर पार पडलेल्या असोसिएशनच्या वार्षिक बैठकीमध्ये नवीन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या असोसिएशनच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये ज्येष्ठ फोटोग्राफर काशिनाथ गोसावी, प्रवीण दिघे, ओंकार कोदे, सलीम पटेल, पंकज देशमुख, गोपाल बोराडे, अमोल नवले, ऋषी दुबे, तानाजी हळनर, अक्षय कोटकर, संतोष दिघे, चेतन कढणे, विठ्ठल जोंधळे, अनिकेत फटांगरे, रामभाऊ भागवत, किरण डोंगरे, संदीप शेळके, निलेश मिसाळ, संतोष नाईकवाडी, दीपक घुले, शहाजी काळे, संतोष देशमुख, गोविंद गोसावी, राजेंद्र गुळवे, राजेंद्र जगताप व विवेक गुंजाळ या सर्व सदस्यांचा समावेश आहे. या निवडीबद्दल अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठीचे ज्ञान अनिवार्य

## मराठी न शिकणाऱ्या चालकांवर कारवाई- परिवहनमंत्री प्रताप सरनाईक




मुंबई

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांना आता मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य करण्यात आले असून, या नियमाची कडक अंमलबजावणी गुरुवार, दि. २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना सुरुवातीला एक महिन्याची मुदत देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज तसेच परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.

मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या वतीने मागील १०५ दिवसांपासून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' राबविण्यात आले. या अभियानाला राज्यातील सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांनी प्रतिसाद देत मराठी भाषेचे प्रशिक्षण घेतले, अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

राज्यात रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान असणे आवश्यक असल्याचा नियम १९८९ पासून अस्तित्वात आहे. आता १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

'मराठी शिकणार नाही' म्हणणाऱ्यांवर थेट कारवाई

मराठी शिकणार नाही किंवा बोलणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या रिक्षा-टॅक्सीचालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य आहे. त्यामुळे अशा चालकांना कोणतीही अतिरिक्त मुदत न देता नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा सरनाईक यांनी दिला.

राज्यात आतापर्यंत सुमारे ९ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी परवाने आणि बॅज वितरित करण्यात आले आहेत. यापुढे नवीन परवाना किंवा बॅज देताना संबंधित चालकाला व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही, याची आरटीओ अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष संवादाद्वारे तपासणी केली जाणार आहे. या प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही करण्यात येणार आहे.

चालकाला मराठीत दैनंदिन व्यवहार करता येत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच त्याला बॅज देण्यात येईल. त्यामुळे राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीसेवेत प्रवाशांशी मराठीत संवाद साधण्याची क्षमता सुनिश्चित करण्यासाठी परिवहन विभागाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार

## ३८३९ हेक्टर शेती झाली सुपीक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्यात ३८३९ हेक्टर जमीन सुपीक झाली आणि त्याचा तब्बल २७६० शेतकऱ्यांना लाभ झाला,अशी माहिती मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे यांनी दिली आहे.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार', ही महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश तलाव, बंधारे आणि नाल्यांमधील गाळ काढून जलसाठवण क्षमता वाढवणे आणि तो गाळ शेतात टाकून जमिनीची सुपीकता सुधारणे हा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षात या योजनेतच्या ५३५कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी ४०५ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. या अभियानात जिल्ह्यात ७१.९१ लक्ष घ. मी. गाळाचा उपसा झाला आहे.हा गाळ ३८३९ हेक्टर शेतजमिनीवर पसरण्यात आला. त्याचा लाभ २७६० शेतकऱ्यांना झाला. अहिल्यानगर जिल्ह्यात अंदाजित ७१०० सघमी इतका पाणीसाठा वाढण्यास मदत झाली आहे. योजनेचे स्वरुपः 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार', या योजनेंतर्गत गाळ वाहून नेणाऱ्या पात्र शेतकरी लाभार्थ्यांना प्रती एकर ३५.७५ रुपये प्रति घनमीटर याप्रमाणे १५ हजार रुपयांच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. हे अनुदान फक्त अडीच एकर पर्यंत म्हणजेच ३७ हजार ५०० रुपये (जास्तीत जास्त) देय राहते.

# कंत्राटदारांचे थकीत बिलासाठी आझाद मैदानात धरणे



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील विविध शासकीय विभागांकडून बांधकाम कंत्राटदारांची तब्बल ८६,६६२ कोटी रुपयांची बिले प्रलंबित असल्याचा दावा महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनने केला आहे. या थकीत बिलांमुळे कंत्राटदारांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला असून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी फेडरेशनकडून १८ आणि १९ ऑगस्ट असे दोन दिवस आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात आले.

कामाची बिले लवकरात लवकर न दिल्यास नागपूरला होणारे 'हिवाळी अधिवेशन चालू देणार नाही, असा इशारा फेडरेशनकडून देण्यात आला आहे. तर कंत्राटदारांच्या हक्कासाठी आम्ही हा लढा रस्त्यापासून विधिमंडळापर्यंत अधिक तीव्र करू, असा इशारा काँग्रेसचे आ. विजय वडेट्टीवार यांनी दिला.

दरम्यान, फेडरेशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित विभागांकडे वेळोवेळी निवेदने, पत्रे आणि बैठकींच्या माध्यमातून पाठपुरावा केला. मात्र, १५ ऑगस्टपर्यंत मोठ्या प्रमाणावर बिले अदा झालेली नसल्याने कंत्राटदारांमध्ये नाराजी वाढली आहे.

२०२४ ते २०२६ या तीन वर्षांत कंत्राटदारांनी विविध प्रकारची कामे केली असून यात प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास, ग्रामविकास, पाणीपुरवठा, जलसंपदा, पर्यटन आणि अन्य विभागांची बिले प्रलंबित आहेत, असे फेडरेशनचे अध्यक्ष एन. टी. लाड यांनी सांगितले. बुधवारी या आंदोलनकर्त्यांची वडेट्टीवार यांनी भेट घेतली. सरकारने कंत्राटदारांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये आणि सर्व प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत, अशी आग्रही मागणी वडेट्टीवार यांनी यावेळी सरकारकडे केली.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/६११/२०२६ दिनांक - १८/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. दशरथ हौशिराम मांडे, रा. पिंपळगाव कोंझीरा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १३/०८/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. पिंपळगाव कोंझीरा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे **दशरथ हौशिराम मांडे** यांचा **जन्म मौजे पिंपळगाव कोंझीरा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०६/१९७२** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव कोंझीरा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव कोंझीरा यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/६१३/२०२६ दिनांक - १८/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. अन्वर बाबुलाल शेख, रा.,संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १२/०८/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा.संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे **अन्वर बाबुलाल शेख** यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०६/१९६६** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

## पान १ वरून - एमआयडीसीच्या प्रस्तावित जागेवरील ...

घालण्याचा प्रयत्न करू नये. अन्यथा मोठे जनआंदोलन उभारले जाईल. येथे एमआयडीसीच उभारली जाईल. एमआयडीसीमुळे ग्रामीण व निमशहरी भागात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि स्थानिक तरुणांना रोजगारासाठी इतर शहरांकडे जाण्याची गरज भासणार नाही.

खांबे ग्रामपंचायतीने सौर प्रकल्पासाठी २०२१ मध्ये संबंधितांना ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिल्याचे सांगत सरपंच रविंद्र दातीर म्हणाले, सौर प्रकल्पासाठी कौठे मलकापूरचीच जागा का निवडण्यात आली? हा प्रकल्प अन्य ठिकाणीही उभारता येऊ शकतो. कौठे मलकापूर येथे एमआयडीसीसाठी मुबलक जागा उपलब्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी सुरू असलेले सौर प्रकल्पाचे काम आम्ही बंद केले आहे. पुन्हा काम सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घारगाव पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे आणि पोलीस उपनिरीक्षक प्रवीण महाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवले. आंदोलनातील गुलाबराजे पांडुरंग भोसले, बाजीनाथ रंगनाथ दातीर, निलेश भाऊसाहेब वाडेकर, रविंद्र सिताराम दातीर, सोमनाथ रघुनाथ बारवे, एकनाथ रामभाऊ बरकडे, अण्णासाहेब कचरू आमले, आदिक उर्फ बबलू बाळासाहेब शेंडगे, रणजित सभाजी ढेरंगे, सुभाष उमाजी ढेंबरे आणि जनार्दन अनाजी डोंगरे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

आंदोलकांचे निवेदन नायब तहसीलदार गणेश आढारी यांनी स्वीकारले. एमआयडीसीसाठी प्रस्तावित जागेवर सौर प्रकल्पाचे काम सुरू ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

**ग्रामपंचायत कोहकडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब -१ निविदा नोटीस**

सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. कोहकडी, ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे कोहकडी येथे पाणी पुरवठा पाईपलाईन करणे. | १५ वित्त आयोग | २३६/- | १% | १६९१२४/- | ६ महिने | सु.बे. |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **कोहकडी** कार्यालयात **दि. २१/०८/२०२६ ते दि. २७/०८/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा **दि. २७/०८/२०२६** रोजी संध्याकाळी ठीक ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **कोहकडी** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **कोहकडी** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. २८/०८/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **कोहकडी** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे ) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. कोहकडी, ता. पारनेर, जि. अ.नगर**

**सरपंच**
**ग्रा.पं. कोहकडी, ता. पारनेर, जि. अ.नगर**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# दाभोलकर हत्या प्रकरणातील दोष सिद्ध तरीही सचिन अंदुरेला जामीन; अंनिसकडून चिंता व्यक्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील दोषसिद्ध आरोपी सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने १८ ऑगस्ट २०२६ रोजी जामीन मंजूर केला असून, अपील प्रलंबित असेपर्यंत त्याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने तीव्र चिंता व निषेध व्यक्त केला आहे.



जामीन मंजूर होणे अथवा शिक्षेला स्थगिती मिळणे म्हणजे दोषसिद्धी रद्द होणे किंवा संबंधित व्यक्ती निर्दोष ठरणे नव्हे, असे समितीने स्पष्ट केले आहे. विशेष न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या दोषसिद्धीविरुद्धचे अपील सध्या न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन आहे.

डॉ. दाभोलकर यांच्या हत्येला तेरा वर्षे पूर्ण होत असताना आणि त्यांच्या स्मृतिदिनाच्या अवघ्या दोन दिवस आधी दोषसिद्ध व्यक्तीला जामीन मिळणे तसेच जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती मिळणे, हे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत कार्यरत हजारो कार्यकर्त्यांसाठी अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक असल्याचे समितीने म्हटले आहे.

या प्रकरणातील हत्येमागील व्यापक कट आणि कथित मास्टरमाईंडपर्यंत पोहोचण्यात तपास यंत्रणेला अपेक्षित यश मिळालेले नाही, ही समितीची पूर्वीपासूनची भूमिका आहे. विशेष न्यायालयाने कथित मास्टरमाईंड म्हणून आरोप असलेले डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांच्यासह अन्य आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली होती. त्यामुळे हत्येमागील संपूर्ण कटाचा उलगडा अद्याप न झालेला असताना दोषसिद्ध व्यक्तीच्या शिक्षेला स्थगिती मिळाल्याने न्यायप्रक्रियेबाबतची अस्वस्थता अधिक वाढल्याचे समितीने म्हटले आहे.

तथापि, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने न्यायव्यवस्था आणि न्यायालयीन प्रक्रियेबद्दल पूर्ण आदर व्यक्त केला आहे. न्यायालयीन आदेशाचा सविस्तर अभ्यास करून कायदेशीर सल्ल्यानुसार आवश्यक ते पुढील न्यायालयीन उपाय केले जातील, असे समितीने स्पष्ट केले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नव्हती, तर विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि संविधानिक मूल्यांवर झालेला हिंसक आघात होता. त्यामुळे या हत्येमागील संपूर्ण कटाचा उलगडा होऊन संबंधित प्रत्येक व्यक्तीची कायदेशीर जबाबदारी निश्चित व्हावी आणि न्याय मिळावा, अशी ठाम मागणी समितीने केली आहे. 'आजचा निर्णय आम्हाला वेदना देतो; मात्र तो आम्हाला विचलित करणार नाही. अंधश्रद्धा, अविवेक, हिंसा आणि विवेकविरोधी प्रवृत्तींच्या विरोधातील लढा अधिक निर्धाराने सुरूच राहील,' असे समितीने म्हटले आहे.

यावेळी राज्य सचिव ॲड. रंजना पगार-गवांदे, संगमनेर शाखेचे कार्याध्यक्ष काशिनाथ गुंजाळ, प्राचार्य अशोक गवांदे, सोमनाथ जोर्वेकर, प्रशांत पानसरे, हरिभाऊ उगले, अरविंद गाडेकर आणि प्रा. सुवर्ण बेनके आदी उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी युवकांनी वनसंरक्षणाचा ध्यास घ्यावा - खरमाळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- पर्यावरणाचे संवर्धन ही केवळ शासन किंवा वन विभागाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. युवकांनी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धन व वनसंरक्षणाचा ध्यास घ्यावा, असे आवाहन सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जुन्नर येथील वनरक्षक रमेश खरमाळे यांनी केले. राजूर महाविद्यालय येथे ग्रीन क्लब व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरण जागृती व वन संरक्षण' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी खरमाळे बोलत होते. या कार्यक्रमास साईयोग फाउंडेशन, राहाता येथील मोहन तांबे, पर्यावरण प्रेमी राहुल राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. बी. वाय. देशमुख होते.

खरमाळे यांनी हवामान बदल, तापमानवाढ, अनियमित पाऊस, पाणीटंचाई, जंगलतोड व जैवविविधतेचा ऱ्हास याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरण सेवा हीच देशसेवा होय, असे सांगत त्यांनी युवकांनी पर्यावरणपूरक



जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले.

राहुल राऊत यांनी पर्यावरण जनजागृती ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे, असे आवाहन केले. यावेळी खरमाळे यांनी वृक्षलागवडीची शास्त्रशुद्ध पद्धत, रोपांची निवड, पाणी व्यवस्थापन व लागवडीनंतरचे संगोपन याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. टी. शेणकर यांनी केले. आभार डॉ. व्ही. एन. गीते यांनी मानले, तर सूत्रसंचालन कॅप्टन रोहित मुठे यांनी केले.

# व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांना 'जाणीव फाऊंडेशन संगमनेर २०२६' पुरस्कार जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करून सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याच्या उद्देशाने जाणीव फाऊंडेशन, संगमनेर यांच्या वतीने देण्यात येणारे 'संगमनेर २०२६ पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. कला विभागातील पुरस्कारासाठी संगमनेरचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार, लेखक व व्याख्याते अरविंद गाडेकर यांची निवड करण्यात आली आहे.



हा पुरस्कार 'लोकनेते बाळासाहेब थोरात गुणगौरव पुरस्कार सोहळ्यात' गाडेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या सामाजिक व कलात्मक योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

अरविंद गाडेकर यांनी व्यंगचित्र, लेखन आणि व्याख्यान या माध्यमांतून सातत्याने समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन व्यसनमुक्ती, वृक्षसंवर्धन, मोबाईलचा अतिवापर तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचे काम ते करीत आहेत. विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये व्यंगचित्रकलेची आवड निर्माण व्हावी आणि कलेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव विकसित व्हावी, यासाठी त्यांनी अनेक शाळांमध्ये चित्रकला व व्यंगचित्रकलेची ओळख करून दिली आहे.

गाडेकर यांनी आतापर्यंत १२,२०० हून अधिक व्यंगचित्रे साकारली असून, या कार्याची दखल घेत त्यांना 'ग्लोबल बुक्स ऑफ अवॉर्ड' हा आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाला आहे. तसेच १० हजार व्यंगचित्रे साकारल्याबद्दल महाराष्ट्र बुक्स ऑफ रेकॉर्डमध्ये त्यांच्या कार्याची नोंद झाली आहे. राज्यातील आघाडीची दैनिके, मासिके आणि दिवाळी अंकांमधून त्यांच्या व्यंगचित्रांना प्रसिद्धी मिळाली आहे.

सामाजिक विषयांवर भाष्य करणाऱ्या त्यांच्या व्यंगचित्रांना विनोदाची जोड असली तरी त्यातून प्रभावी प्रबोधन घडते. 'व्यंगचित्रातून प्रबोधन' या संकल्पनेतून व्यसन, मोबाईलचा अतिवापर, पर्यावरण, स्वच्छता, सायबर फसवणूक, आभासी नातेसंबंध, फास्ट फूड आणि आरोग्य अशा विविध सामाजिक विषयांवर ते सातत्याने भाष्य करीत आहेत.

या पुरस्कार सोहळ्यास माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, विधानपरिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे, शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, पद्मश्री रघुवीर खेडकर, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, विद्यमान नगराध्यक्ष मैथिली तांबे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अरविंद गाडेकर यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि कलात्मक कार्याची दखल घेत जाणीव फाऊंडेशनने जाहीर केलेल्या या पुरस्काराबद्दल संगमनेर परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# झेडपी शाळेमुळे उंचखडक बु . गावची ओळख महाराष्ट्रात पोहचली – आरटीओ श्रीकांत मंडलिक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -नोकरी निमित्तिने आम्ही राज्यभर फिरत असतो. अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या बैठकीत माझी ओळख देताना उंचखडक बु गावाचे नाव सांगितले की, तुमच्या गावची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फार चांगली झाली आहे. आम्ही सोशल मीडियावर पहात असतो अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आम्हाला मिळतात.

त्यामुळे झेडपी शाळा, देवस्थान, सदन शेतीमुळे उंचखडक बु गावचे नाव महाराष्ट्रात पोहचले असे प्रतिपादन आरटीओ श्रीकांत मंडलिक यांनी केली. यावेळी त्यांनी दिंडोरी तहसिलदार मुकेश कांबळे यांनी नाशिक येथील मिटींगमध्ये उंचखडक बु शाळेचा उल्लेख केल्याचा संदर्भ दिला. ते झेडपी शाळा उंचखडक बु येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी ध्वजारोहनाप्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अगस्ति कारखान्याचे मा. संचालक भाऊमामा खरात होते.

मंडलिक पुढे म्हणाले. की, माझ्या मागिल पिढी मंदिरात बसून शिक्षण घेत होती, मी शेणाने सारविलेल्या दोन खोल्यांमध्ये शिक्षण घेतले आणि आताच्या पिढीला प्रशस्त इमारत, डिजीटल रुम व सुसज्ज व्यवस्था दिसते आहे. म्हणून तर अपाली शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा यात उपक्रमाच प्रथम आली, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात निवड झाली, शाळेला आयएसओ मानांकन मिळाले, पहिल्याच प्रयत्नात तीन विद्यार्थी नवोदय विद्यालयास निवडले, दोन विद्यार्थी सैनिकी स्कुलसाठी व विविध स्पर्धा परिक्षेत अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. तालुक्याच्या ठिकाणाहून विद्यार्थी गावाकडे



शाळेत येतात ही उंचखडक बु शाळेच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. यात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे आणि त्यांच्या टिमचे फार अथक परिश्रम आहे. हे सर्व राजकारण विरहीत टिकेले अशी अपेक्षा मंडलिक यांनी व्यक्त केली. तर अध्यक्षपदी असणारे भाऊमामा खरात म्हणाले. की, गेल्या काही दिवसांपासून शाळेत राजकीय हस्तक्षेप होताना दिसतो आहे, तो फार खेदजन वाटतो. तीन वर्षापुर्वी ही शाळा बंद पडली होती, ती सागर शिंदे आणि गावातील तरुणांनी सुरु केली आहे. मात्र, आता जर शाळा बंद पडली तर पुन्हा चालु होणार नाही. त्यामुळे, शाळेत जो अनावश्यक हस्तक्षेप चालु आहे तो थांबविला पाहिजे. गोरगरिबांची लेकरं शाळेत शिकतात त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा घाट कोणीही घालु नये. आम्ही शाळेच्या पाठीशी भक्कम उभे आहोत.

# मृद व जलसंधारण जनजागृतीसाठी अहिल्यानगर सज्ज

## २१ ऑगस्टला 'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर'

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत दि. १५ ते २१ ऑगस्ट २०२६ हा कालावधी 'जलसंधारण सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येत आहे. जलसंधारणाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करणे आणि विशेषतः युवक व विद्यार्थ्यांचा या लोकचळवळीत सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने सप्ताहादरम्यान विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



जलसंधारण जनजागृतीसाठी १५ ते ३० वयोगटातील युवकांसाठी जलसंधारण विषयावर रिल्स बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यास २५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. युवकांनी सर्जनशील माध्यमातून जलसंधारण, पाणी बचत, मृदसंवर्धन आणि पाण्याचा काटकसरीने वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, शिक्षण विभागाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंधारणाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या कल्पकतेला आणि अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

२१ ऑगस्टला 'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर'

जलसंधारण सप्ताहाच्या प्रमुख उपक्रमांतर्गत दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरातील जॉगिंग ट्रॅक, निरंकार भवन येथून 'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. मृद व जलसंधारणाबाबत जनजागृतीचा संदेश देत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी या वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. वॉकेथॉनमधील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार असून प्रथम क्रमांकास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये असे पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्यक्ष सहभागींपैकी ईश्वर चिठ्ठीद्वारे प्रत्येकी ३ हजार रुपयांचे ७ विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत. वॉकेथॉननंतर जलसंधारण सप्ताहादरम्यान आयोजित विविध स्पर्धांमधील गुणवंत स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

**असा असेल वॉकेथॉनचा मार्ग-** जॉगिंग ट्रॅक - कलानगर चौक - सपकाळ हॉस्पिटल/बारस्कर चौक - सोनानगर चौक - कुष्ठधाम रोड मार्गे प्रोफेसर चौक - टी.व्ही. सेंटर चौक - गंगा उद्यान - जॉगिंग ट्रॅक.

**नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा**

जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे १५ वर्षांवरील सर्व नागरिकांनी जलसंधारण सप्ताहातील विविध स्पर्धा आणि 'महा वॉकेथॉन'मध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन 'मृद व जलसंधारण - सुरक्षित भविष्यासाठी आवश्यक संकल्प' या संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वॉकेथॉनसाठी नोंदणी करण्याकरिता QR कोड स्कॅन करून अथवा https://register.mahaevent.co.in या संकेतस्थळावर जाऊन सहभाग नोंदविता येणार आहे.

चला, एक पाऊल मृद व जलसंधारण जनजागृतीसाठी टाकूया...! 'पाणी वाचवा, माती वाचवा - भविष्यासाठी जलसुरक्षा जपूया!'

# लोटस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

वडगावपान - लोटस इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडगावपान येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, प्रभावी भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्यलढ्यातील वीरांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक डॉ. शांताराम निघुते, संचालिका डॉ. नीलिमा निघुते, संचालक बाळासाहेब बनोटे, कल्याणी सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन प्राचार्या आशालता शेट्टी, क्रीडा शिक्षक कुणाल गायकवाड व विशाल शेवाळे यांनी केले. कार्यक्रमस्थळाची आकर्षक सजावट मोरेश्वर फुलभाटी यांनी केली. इयत्ता दहावीतील समीर रोहन व ओमेश्वर पावरा यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेचा परिसर देशभक्तीच्या जल्लोषाने भारावून गेला. 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उत्साह, शिस्त आणि देशप्रेमाचा संदेश देत स्वातंत्र्य दिनाचा हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

# संपादकीय...

## डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर स्मृतीदिन

# तारकांच्या विश्वाचा महान अभ्यासक

मानवाने आकाशाकडे पाहून असंख्य प्रश्न विचारले आणि त्यातूनच खगोलशास्त्राचा जन्म झाला. तारका कशा निर्माण होतात? त्यांचे आयुष्य किती असते? त्यांचा शेवट कसा होतो? काही तारे पांढरे बटू का बनतात, तर काहींचा अंत प्रचंड स्फोटात का होतो? या प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या महान शास्त्रज्ञांमध्ये भारतीय वंशाचे डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. तारकांची रचना, त्यांचे जीवनचक्र आणि त्यांच्या अंतिम अवस्थेचा अभ्यास करून त्यांनी आधुनिक खगोलभौतिकीला नवी दिशा दिली. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९१० रोजी लाहोर येथे झाला. त्यांचे कुटुंब अत्यंत बुद्धिमान आणि शिक्षणप्रिय होते. त्यांचे काका सर चंद्रशेखर वेंकट रमण हे भारताचे महान भौतिकशास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते होते. घरातील बौद्धिक वातावरणाचा चंद्रशेखर यांच्या जडणघडणीवर मोठा प्रभाव पडला. लहानपणापासूनच त्यांना गणित आणि भौतिकशास्त्राची विशेष आवड होती. त्यांनी मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. विद्यार्थी असतानाच त्यांनी भौतिकशास्त्रातील संशोधन सुरू केले. पुढील उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात गेले. अत्यंत तरुण वयातच त्यांनी तारकांच्या अंतर्गत रचनेचा आणि त्यांच्या स्थैर्याचा सखोल अभ्यास सुरू केला. चंद्रशेखर यांच्या संशोधनातील सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे 'चंद्रशेखर मर्यादा' (उहरपवीरीशज्ञहरी डळाळीं). एखाद्या तारकाचे इंधन संपल्यानंतर तो 'पांढरा बटू' म्हणजेच थहळींश ुरीष या अवस्थेत जाऊ शकतो. मात्र, अशा ताऱ्याचे वस्तुमान एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त असल्यास तो पांढरा बटू म्हणून स्थिर राहू शकत नाही. ही मर्यादा सुमारे सूर्याच्या वस्तुमानाच्या १.४४ पट आहे. याच मर्यादेला चंद्रशेखर मर्यादा म्हटले जाते. ही संकल्पना त्या काळातील अनेक शास्त्रज्ञांना सुरुवातीला मान्य नव्हती. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ सर आर्थर एडिंग्टन यांनीही चंद्रशेखर यांच्या निष्कर्षांवर तीव्र आक्षेप घेतला. मात्र चंद्रशेखर आपल्या गणितीय विश्लेषणावर ठाम राहिले. पुढील काळात त्यांच्या सिद्धांताला मान्यता मिळाली आणि तारकांच्या उत्क्रांतीचा अभ्यास करण्यासाठी तो मूलभूत सिद्धांत ठरला. चंद्रशेखर मर्यादेचे महत्त्व केवळ पांढऱ्या बटू ताऱ्यांपुरते मर्यादित नाही. एखाद्या मोठ्या ताऱ्याचे वस्तुमान या मर्यादेपेक्षा जास्त असल्यास त्याच्या अंतिम अवस्थेत वेगवेगळ्या प्रकारच्या प्रक्रिया घडू शकतात. त्यातून न्यूट्रॉन तारे किंवा कृष्णविवरांसारख्या अत्यंत घन वस्तूंच्या निर्मितीचा मार्ग स्पष्ट होतो. त्यामुळे चंद्रशेखर यांच्या संशोधनाने कृष्णविवरांच्या अभ्यासालाही महत्त्वपूर्ण सैद्धांतिक आधार दिला. त्यांचे संशोधन अत्यंत व्यापक होते. त्यांनी तारकांची रचना, तारकांची उत्क्रांती, कृष्णविवरे, विकिरणाचे स्थानांतरण, द्रवगतिकी, गुरुत्वीय स्थैर्य आणि गणितीय भौतिकशास्त्र अशा अनेक विषयांवर काम केले. त्यांच्या वैज्ञानिक कार्याची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे अत्यंत गुंतागुंतीच्या खगोलीय प्रश्नांकडे गणिताच्या अचूक साधनांनी पाहण्याची त्यांची पद्धत. १९३७ मध्ये चंद्रशेखर अमेरिकेतील शिकागो विद्यापीठात दाखल झाले आणि पुढील अनेक दशके त्यांनी तेथे संशोधन व अध्यापन केले. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वैज्ञानिक म्हणून ते जितके महान होते, तितकेच शिक्षक म्हणूनही प्रेरणादायी होते. कठोर गणितीय विचार, शिस्तबद्ध संशोधन आणि ज्ञानाविषयीची प्रचंड निष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून १९८३ मध्ये त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. विल्यम ए. फॉलर यांच्यासोबत त्यांना हे पारितोषिक मिळाले. तारकांची रचना आणि उत्क्रांतीशी संबंधित महत्त्वपूर्ण भौतिक प्रक्रियांवरील त्यांच्या सैद्धांतिक अभ्यासासाठी हा सन्मान देण्यात आला. चंद्रशेखर यांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका वैज्ञानिकाचे नव्हते; ते ज्ञानाच्या अखंड शोधाचे प्रतीक होते. त्यांना संगीत, साहित्य आणि सौंदर्यशास्त्राचीही आवड होती. विज्ञानातील अचूकता आणि कलाक्षेत्रातील सौंदर्य यांच्यातील संबंध त्यांना जाणवत असे. त्यांनी आपल्या आयुष्याचा मोठा भाग विश्व समजून घेण्यासाठी आणि पुढील पिढ्यांना ज्ञान देण्यासाठी समर्पित केला. २१ ऑगस्ट १९९५ रोजी शिकागो येथे त्यांचे निधन झाले. मात्र त्यांच्या संशोधनाचा प्रभाव आजही खगोलभौतिकीमध्ये कायम आहे. आधुनिक दुर्बिणी, संगणकीय खगोलशास्त्र आणि कृष्णविवरांच्या अभ्यासातून विश्वातील असंख्य घटनांचा शोध घेताना चंद्रशेखर यांच्या सिद्धांतांचा आधार घेतला जातो. तारकांचे आयुष्य, त्यांचा जन्म आणि मृत्यू यांचा अभ्यास करताना चंद्रशेखर यांनी माणसाला विश्वाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. त्यांच्या नावाने 'चंद्रशेखर मर्यादा' ही संकल्पना आज जगभरातील विज्ञान विद्यार्थ्यांना परिचित आहे. एका भारतीय शास्त्रज्ञाने विश्वाच्या अथांग रहस्यांचा शोध घेताना मिळवलेले हे योगदान भारताच्या वैज्ञानिक परंपरेचा अभिमान वाढवणारे आहे.

# माझी स्मरणगाथा' अकोले तालुक्याच्या इतिहासाची अभ्यासपूर्ण बखर : प्रा. डॉ. सांगळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - 'माझी स्मरणगाथा' हे पुस्तक अकोले तालुक्याच्या इतिहास, समाजजीवन, संस्कृती आणि परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार असून इतिहासप्रेमी, साहित्यप्रेमी आणि संशोधकांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी व्यक्त केली.



अकोले तालुक्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा वेध घेणारे ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे लिखित 'माझी स्मरणगाथा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी अकोले महाविद्यालयातील के. बी. दादा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सांगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चपराक प्रकाशक व ज्येष्ठ संपादक घनश्याम पाटील होते.

प्रारंभी अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. एस. झेड. देशमुख, डॉ. संदीप सांगळे, प्रकाशक घनश्याम पाटील, साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांच्यासह मान्यवरांच्या शुभहस्ते 'माझी स्मरणगाथा'चे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार डॉ. किरण लहामटे म्हणाले की, ज्याला अकोले तालुका समजून घ्यायचा आहे आणि ज्याच्या मनात या तालुक्याविषयी आस्था आहे, त्याने हे पुस्तक आवर्जून वाचावे. अकोले तालुक्यातील पर्यटनाला चालना देतानाच तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीनेही हे पुस्तक महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात प्रकाशक घनश्याम पाटील यांनी 'माझी स्मरणगाथा' हे पुस्तक म्हणजे अकोले तालुक्याचा इतिहासाचे संदर्भ मूल्य असणारे पुस्तक असल्याचे सांगितले. तालुक्याच्या विविध पैलूंचा दस्तऐवजीकरणाच्या माध्यमातून घेतलेला हा वेध भावी पिढ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक शांताराम गजे, प्रा. एस. झेड. देशमुख, साहित्यिक संदीप वाकचौरे, सेवानिवृत्त अपर पोलीस अधीक्षक भाऊसाहेब गायकर, इंजि.अक्षय आरोटे आणि कु. वीरा कालेहर यांनी मनोगते व्यक्त करून 'माझी स्मरणगाथा'च्या लेखनाचे आणि तालुक्याच्या इतिहासाच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित केले.

पुस्तकास सुंदर छायाचित्रे देऊन बहुमोल सहकार्य केल्याबद्दल प्रेस फोटोग्राफर राजेंद्र मालुंजकर, विलास तुपे व प्रा.सुनील वलवे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पुस्तकाचे लेखक तथा ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे यांनी केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अमित भांगरे, अगस्ति एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष सतिश नाईकवाडी, ॲड. वसंतराव मनकर, ॲड. के. बी. हांडे, महेश नवले, इंजि.नानासाहेब खर्डे,संपतराव नाईकवाडी, भूषण शिंगोटे, लक्ष्मण आव्हाड, महेश नवले, माधव तिटमे, हेमंत दराडे, प्रकाश टाकळकर, भाऊसाहेब चासकर, भाऊसाहेब कासार, श्रीनिवास येलमामे, उदय माळवे, अमोल वैद्य, विद्याचंद्र सातपुते, श्रीनिवास रेणुकादास, ब्राह्मणवाडा ग्रामस्थ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# सायखिंडीच्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाची अनोखी भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

सायखिंडी - भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सायखिंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांनी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गावचे सुपुत्र, सामाजिक कार्यकर्ते व प्रथितयश अभियंता संतोष गोपीनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांसाठी सामाजिक बांधिलकी जपत दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले.

मार्गदर्शक संदेश गायकवाड यांच्या प्रेरणेतून अभियंता संतोष शिंदे यांनी आपल्या मातोश्री सौ. रंजना गोपीनाथ शिंदे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार स्पोर्ट ड्रेसचे वाटप केले. शिक्षणाबरोबरच खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीला महत्त्व देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

दरम्यान, अभियंता शिंदे यांनी यापूर्वीही मनोहर बाबा विद्यालय, सायखिंडी येथील विद्यार्थ्यांच्या संगणकीय शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने अत्याधुनिक कॉम्प्युटर सेट भेट दिला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे आणि त्यांना डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणता यावे, या सामाजिक जाणिवेतून त्यांनी हा उपक्रम केला.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेसचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, ज्येष्ठ नागरिक, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियंता संतोष शिंदे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थीहिताच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या योगदानामुळे सायखिंडीच्या शैक्षणिक वाटचालीला निश्चितच बळ मिळाले आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

# शिष्यवृत्ती परीक्षेत सह्याद्री विद्यालयाचे यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शिक्षण विभागाने घेतलेल्या इयत्ता पाचवी, इयत्ता सातवी व इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाने उज्वल यश मिळवून तालुक्यात बाजी मारली असल्याची माहिती मुख्याध्यापक एस. एम. खेमनर यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले कि, माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह्याद्री विद्यालयाने गुणवत्तेत आपला अग्रक्रम कायम राखला आहे.सह्याद्री विद्यालयाचे इयत्ता आठवीचे ९ विद्यार्थी, इयत्ता पाचवी मध्ये ६ विद्यार्थी तर इयत्ता सातवी मध्ये ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र ठरले. असे एकूण २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र होऊन ग कुटे साईशा बाबासाहेब २५० गुण, गंभीरे उत्कर्ष गणपत २५० गुण ,सानप विवेक वेरुनाथ २४४ गुण, वर्पे कार्तिकी विलास २४२ ,गुण आहेर ज्ञानेश्वरी राम २२० गुण ,ढाकणे प्रतीक नानासाहेब २२० गुण, वाकचौरे योगेश यश योगेश २१८ गुण, थोरात सायरा संतोष २१६ गुण, आभारी संस्कृती बाळासाहेब २१४ गुण मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना श्री वीरेश नवले सर यांनी मार्गदर्शन केले.

तर इयत्ता सातवीचे पवार सर्वेस प्रल्हाद २६६ गुण, कडलग आयुष संजय २४६ गुण, खेमनर हर्षवर्धन सुभाष २४६ गुण, वाकचौरे अर्णव अनिल २४४ गुण ,हासे अद्वैत भारत २४० गुण, हिरे खुषी गणपत २३० गुण, सरोदे कौस्तुभ गणेश २२० गुण , या यशस्वी विद्यार्थ्यांना श्रीमती माळी सरला मॅडम , वायाळ मयुरी मयुरी मॅडम ,पठारे सोनाली मॅडम व मोहिते आरती मॅडम यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता पाचवी चे सानप चेतना वेणूनाथ २३० गुण, खाडे हेरंब एकनाथ २२८ गुण, महाले श्लोक मनोज २२४ गुण, पचपिंड आयुष्य योगेश २०६ गुण, उगले रोहिणी विलास २०६ गुण, या यशस्वी विद्यार्थ्यांना श्री शरद नवले सर व अजीम शेख सर यांनी मार्गदर्शन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात साहेब, संस्थेचे चेअरमन मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेचे सेक्रेटरी सुमंतजी कोल्हे, आ. सत्यजीत तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, सौ. दुर्गाताई तांबे, संगमनेर शहराच्या विद्यमान नगराध्यक्ष सौ. मैथीलीताई तांबे, संस्थेचे खजिनदार ॲड. ज्ञानेश्वर सांगळे, संचालक प्रा. बाबा खरात सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक एस एम खेमनर सर, उपमुख्याध्यापिका एस. ए. दिघे मॅडम, पर्यवेक्षक के. डी. देशमुख सर , पर्यवेक्षक दिघे ए. टी. सर, तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवा वृंद व पालक वर्गाने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## जाहीर लिलाव

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरगाव पावसा**

**ता. संगमनेर, जि.अहमदनगर**

दिनांक २७/८/ २०२६ रोजी शाळेचे जुने पत्रे, लाकूड व इतर खराब झालेले भंगार मधील साहित्य यांचा जाहीर लिलाव करणे आहे. इच्छूकांनी या लिलावामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

ठिकाण – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरगाव पावसा

वेळ : सकाळी १०.०० वाजता.

**मुख्याध्यापक**

**जि. प. प्राथ. शाळा, हिवरगाव पावसा**

## प्रतिज्ञापत्र

प्रतिज्ञापत्र आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी ते दिवशी
मा. नोटरी पब्लिक साहेब संगमनेर यांचे समोर
प्रति,
मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी साहेब,
श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.अ.नगर.
प्रतिज्ञापत्र करणार :- १.) कौसर एजाज शेख, वय-४५ वर्ष, धंदा-गृहिणी
२.) शाफिन एजाज शेख, वय - २१ वर्षे,
३.) वासिक एजाज शेख, वय- १६ वर्षे ... यांचे करीता अ.प.क.
आई- कौसर एजाज शेख
रा. गलांडे मळा, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.
सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र / संमतीपत्र लिहून देतो की,

मी वरील पत्यावरील रहिवासी असुन प्रतिज्ञापत्र / संमतीपत्र करणार नं. १ यांचे **पती** व नं.२ व ३ यांचे **वडिल** नामे **एजाज पिरमोहम्मद शेख** हे घरी: **भारत नगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे दिनांक : २३/१२/२०२५ रोजी मयत झालेले आहेत.

तरी प्रतिज्ञापत्र / संमतीपत्र करणार नं. १ यांचे **पती** व नं. २ व ३ यांचे **वडिल** नामे **एजाज पिरमोहम्मद शेख** यांच्या नावे REN-ULT T INDI- PVT.LTD या कंपनीची TRIBER RXT PETROL MT 1 OL ECE ही (7 SITER) चारचाकी कमर्शिअल गाडी / वाहन असुन तिचा रजिस्टर क्रमांक MH-17-CM-7719 असा आहे. तरी येणेप्रमाणे सदरची चारचाकी गाडी / वाहन हे मयत **एजाज पिरमोहम्मद शेख** यांच्या नावे नोंदणीकृत असुन सदर आर. सी. बुकची एक साक्षांकित प्रत सदर प्रतिज्ञापत्रासमवेत जोडलेली आहे.

तथापि, **एजाज पिरमोहम्मद शेख** हे मयत झालेले असल्याकारणाने त्यांच्या नावावर नोंदणीकृत असलेली व त्यांच्या स्वमालकीची गाडी / वाहन हे त्यांची कायदेशीर पत्नी वारस या नात्याने प्रतिज्ञापत्र करणार नं. १ त्यांची पत्नी- कौसर एजाज शेख हयांच्या नावे कायमस्वरुपी ट्रान्सफर होणेकामी वरीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करणार नं. २ मयताचा मुलगा - शाफिन एजाज शेख व नं. ३ मुलगा वासिक एजाज शेख आम्ही राजीखुशीने संमती देत आहोत सदर वाहन कायमस्वरुपी वारस पत्नीच्या नावे ट्रान्सफर होणकामी आमची आता किंवा भविष्यकाळात कोणतीही हरकत अगर तक्रार राहणार नाही हे आंम्ही सत्य प्रतिज्ञेवर लिहुन देत आहे.

तसेच आम्ही सत्य प्रतिज्ञेवर लिहुन देतो की, मयत **एजाज पिरमोहम्मद शेख** यांच्या मृत्यूपश्चात त्यांना आम्ही प्रतिज्ञापत्र करणार नं. १ ते ३ पत्नी, १ व २ मुले हेच कायदेशीर वारसदार असुन आंम्हा तिघांव्यतिरिक्त मयतास अन्य दुसरे कोणीही कायदेशीर वारसदार नाही व वारसांबाबत न्यायालयात: कोणताही वाद अथवा दावा प्रलंबित किंवा दाखल नाही. तरी येणेप्रमाणे सदरचे वाहन हे मयताची कायदेशीर पत्नी व प्रतिज्ञापत्र करणार नं. २ व ३ आमची आई या नात्याने **कौसर एजाज शेख** यांच्या नावे ट्रान्सफर करण्यात यावी. याकामी आमची पूर्णपणे सजीखुशीने संमती आहे याकामी आम्ही हे सत्य प्रतिज्ञापत्र / संमतीपत्र लिहुन दिले असे. तरी सदर वाहन ट्रान्सफर होणेबाबत किंवा सदरचे संमतीबाबत आता किंवा भविष्यकाळात या संदर्भात काही अडचणी उदभवल्यास त्यास आंम्ही पुर्णपणे जबाबदार राहु. त्याची तोषीस आम्ही संबंधीत प्राधिकृत कार्यालय, अधिकारी / कर्मचारी यांना लागु देणार नाही याची लेखी हमी या सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे देत आहे.

वरील प्रतिज्ञापत्र लेखात सादर केलेला सर्व मजकुर खरा व बरोबर असुने सदर मजकुर असत्य निघाल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ या कायदयाच्या कलम २३६, २३७ नुसार मी गुन्हयास पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे व कलम २२९ (२) नुसार होणा-या शिक्षेस मी पात्र राहिल हे लिहुन दिले.

**कौसर एजाज शेख**

## पाहिजेत

**स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस**

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सिक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

**7709828846**

## CHANGE IN NAME

My previous name was **UMARFARUQ LATIF ATTAR,** and from now on, it has been changed to **UMARFARUK LATIF ATTAR.**

Affidavit Numbers: 11505, reg. No. 3234, 350429 Date: 19/08/2026

## पाहिजेत

**सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर**

ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिंटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)

– संपर्क –

**९८२२४५३०३६**

## JOB

SR THORAT | GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




## पाहिजेत

**श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्**
**श्री गणेश टायर्स**
**श्री गणेश ऑइल सेंटर**
या फर्मसाठी

**अकाऊंटंट - 2 जागा**

पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक

कामाचा अनुभव आवश्यक

**८९९९८६२७५९**

## नेवासकर ऑटोमोबाईल्स

## पाहिजेत

**सर्व्हीस सुपरव्हायझर २ जागा**

संगमनेर

**8793223344**
**8446300400**

## पाहिजेत

डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –
डायलिसिस टेक्निशियन -२
कॅथलॅब टेक्निशियन - १
नर्सिंग सुपरवाईझर -१

**कुटे हॉस्पिटल**

ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

**8888882225**
**9766855593**

## फ्लॅट विकणे आहे

**2 BHK फ्लॅट विकणे आहे नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह**

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

– संपर्क –

**8788945208**
**8208223721**

# सातव्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत संगमनेर विजेता !

## कोकमठाण येथे पार पडल्या स्पर्धा; २५० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग

कोकमठाण येथे पार पडलेल्या सातव्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत जिल्ह्यातील शालेय योगासनपटूंनी आपल्या अद्वितीय कौशल्याच्या बळावर पदकांची लयलूट केली. अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशनने समता इंटरनॅशनल स्कूलच्या सहकार्याने या दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात विविध वयोगटातील स्पर्धकांनी योगासनांमधील क्लिष्ट आसनही अतिशय सफाईदारपणे सादर करुन उपस्थितांची मनं जिंकली. शारीरिक लवचिकता, एकाग्रता आणि शिस्तबद्ध सादरीकरण या निकषांवर आधारित या स्पर्धेत संगमनेरच्या संघाने विजेतेपद मिळवले. अहिल्यानगरचा संघ दुसर्या तर, अकोले संघाने तिसर्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

शालेय गटापासून वयस्कापर्यंतच्या विविध गटांत झालेल्या सर्वच लढतीत खेळाडूंनी आपले कौशल्य दाखवले. मुलांच्या सब ज्युनिअर गटात वर्चस्व राखताना योगासनांच्या पारंपरिक प्रकारात संगमनेरच्या रोहन सुनील तायडे, तन्मय संदीप म्हाळसकर व अंश रुपेश मयेकर यांनी, मुलींच्या गटात देवांशी नागराज वाकळे, अन्वेषा सुमंथा साहा व श्रद्धा नवनाथ देसाई यांनी, याच प्रकारातील मुलांच्या ज्युनिअर गटात प्रणव साहू, आर्यन विभीषण खरात व यश किरण लगड यांनी, तर मुलींच्या गटात प्रांजल ससोमनाथ व्हन्ना, तृप्ती रमेश डोंगरे व शक्ति संजना टी. यांनी, पारंपरिक प्रकारातील मुलांच्या सिनिअर गटात रुपेश मोगलाली सांगे, प्रीत नीलेश बोरकर व दीपक बेनकर यांनी आणि मुलींच्या गटात रुद्रांशी भावे, गीता सारंग शिंदे व मृणाली मोहन बाणाईत प्रत्येक गटातील



अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य अशी तिनही पदकं पटकावली.

तर, मुलांच्या सिनिअर 'अ' गटात संगमनेरच्या अनिरुद्ध संजय रहाणे याने सुवर्ण आणि मुलींच्या गटात अहिल्यानगरच्या तेजस्वीनी वेनुनाथ डांगे, कोपरगावच्या रश्मी ऋषीकेश भडकवाड व संगमनेरच्या हर्षदा सावळेराम रहाणे यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. मुलांच्या पारंपरिक प्रकारातील सिनअर 'ब' गटात कोपरगावच्या वासुदेव साळुंखे व अखिलेश अशोक समदाडीया यांनी तर, मुलींच्या गटात अहिल्यानगरच्या जयश्री नीलेश हराळे, रचना महादेव गिरी व कोपरगावच्या स्वाती संदीप कोयटे यांनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकाची कमाई केली.

मुलांच्या सिनिअर 'क' गटात राहात्याच्या तुषार रमेश सिसोदिया, कोपरगावच्या संदीप दत्तात्रय नलगे व श्रीरामपूरच्या संदीप सुधीर कासार यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. मुलांच्या कलात्मक एकेरी सब ज्युनिअर गटातही संगमनेरने आपले वर्चस्व राखताना अंश मयेकर, रोहन तायडे व साधन सज्जा यांनी, मुलींच्या गटात संगमनेरच्याच देवांशी वाकले, तनुश्री अजय गोल्हार व हिंदवी परमेश्वर चौरे यांनी, मुलांच्या ज्युनिअर गटात प्रणव साहू, आर्यन खरात व पारस यांनी, तर मुलींच्या गटात प्रांजल व्हन्ना, तृप्ती डोंगरे व के. दक्षथा यांनी तिनही पदकं पटकावली. सिनिअर गटात रुपेश सांगे व प्रवीण पाटील यांनी व मुलींच्या गटात गीता सारंग शिंदे व रुद्राक्षी भावे यांनी आपल्या गटातील सर्व पदकं पटकावली. पारंपरिक दुहेरी प्रकारात संगमनेरच्या अंश मयेकर व तन्मय म्हाळसकर यांच्या जोडीने सुवर्ण, अकोल्याच्या विहान मेहुल शहा व श्रेयस सुनील कासार यांच्या जोडीने रौप्य तर, कोपरगावच्या समर्थ नामदेव ढाकले व विश्वजीत सागर शिंदे यांनी कांस्य पदकाची कमाई केली. मुलांच्या ज्युनिअर गटात कलात्मक दुहेरी प्रकारातही प्रणव साहु व यश लगड, मुलींमध्ये संगमनेरच्या तृप्ती डोंगरे व प्रांजल व्हन्ना, अकोल्याच्या स्नेहल संजय शेटे व अनुष्का प्रकाश सुर्वे आणि अहिल्यानगरच्या धनश्री नीलेश हराळे व रुचा त्रिंबक जाधव यांच्या जोडीने सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकाची कमाई केली.

मुलांच्या सब ज्युनिअर गटात रोहन तायडे व अंश मयेकर यांनी सुवर्ण पदकासह आघाडी घेतली. अहिल्यानगरच्या रिधम वर्धमान भंडारी व चैतन्य सौरभ गोरडे यांनी रौप्य तर, तेथीलच शौर्य अभिजीत देशपांडे व रुद्र अनुपम शिंदे यांनी कांस्य पदक मिळवले. तर मुलींच्या गटात संगमनेरच्या देवांशी वाकळे व तनुश्री गोल्हार, अहिल्यानगरच्या भार्गवी संभाजी कराळे व दक्षिजा दीपक बोठे व अकोल्याच्या काव्या विजय शेणकर व वैष्णवी संजय शेटे यांच्या जोडीने अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. मुलांच्या तालात्मक ज्युनिअर गटात संगमनेरच्या आर्यन खरात व प्रणव साहू आणि सिनिअर गटात प्रीत बोरकर व रुपेश सांगे यांच्या जोडीने प्रथम क्रमांकासह सुवर्ण मिळवले.

मुलींच्या सिनिअर गटातील कलात्मक दुहेरीमध्ये संगमनेरच्या गीता शिंदे व रुद्राक्षी भावे यांनी बाजी मारली. याच वयोगटातील तालात्मक दुहेरी प्रकारातही संगमनेरच्या देवांक्षी वाकळे व हिंदवी चौरे यांनी सुवर्ण, अहिल्यानगरच्या श्रद्धा देसाई व साईदृश्वा चंदा यांनी रौप्य व भार्गवी होंडे व वेदश्री देशपांडे यांनी कांस्य पदकं मिळवले.

याच प्रकारातील मुलींच्या ज्युनिअर गटात रिद्धी संतोष लगड व सिद्धी लगड यांनी पहिला, संगमनेरच्याच टी शक्ति संजना व के. दक्षथा यांनी दुसरा तर, अहिल्यानगरच्या पीहू सांगळे व वेदीका देशपांडे यांनी तिसरा क्रमांक मिळवत सातवी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा गाजवली. या स्पर्धेतील एकूण कामगिरीच्या बळावर संगमनेरने विजेतेपदाचा बहुमान मिळवला तर, अहिल्यानगरच्या संघाला दुसरे आणि अकोल्याच्या संघाला तिसरे स्थान मिळाले.


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com | दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/६१४/२०२६ | दिनांक - १८/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. रईसाबानो हबीब शेख, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक २०/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा.संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे शेख रईसा बानो शेख हबीबी यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ३०/०६/१९७१** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# 2030 पर्यंत चंद्रावर मायनिंग, डेटा सेंटरसारख्या क्षेत्रांत नोकऱ्या मिळतील

न्यूयॉर्क(वृत्तसंस्था)

अमेरिकन कंपनी व्हॉयेजर टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि सीईओ डायलन टेलर यांचे म्हणणे आहे की, २०३० पर्यंत चंद्रावर ये-जा करणे शक्य होऊ शकते. त्यांच्या मते, आगामी काळात माणसे अंतराळात राहतील आणि तिथे कामही करतील. टेलर म्हणाले की, पुढे जाऊन अंतराळात मिनरल्स काढणे, ऑर्बिटल डेटा सेंटर बनवणे आणि पॉवर ग्रिड तयार करणे यासारखी कामे होतील. त्यांचे असे मानणे आहे की, या कामांमध्ये ह्युमनॉइड रोबोट माणसांची जागा पूर्णपणे घेऊ शकणार नाहीत. ते म्हणाले की, तुम्ही ऑप्टिमससारख्या रोबोटला प्रोग्राम करून चंद्रावर प्रत्येक काम करून घेऊ शकत नाही. अनेक कामांमध्ये सूक्ष्म समज आणि वेळेवर निर्णय घेण्यासाठी माणसांची गरज भासेल. टेलर यांच्या मते, इंटरनॅशनल स्पेस स्टेशनमध्ये २६ वर्षांपासून सतत माणसे उपस्थित आहेत.



टेलर यांच्या मते, चंद्राच्या तुलनेत मंगळ खूप दूर आहे आणि तिथे रेडिएशनची मोठी अडचण आहे. जोपर्यंत पृथ्वीवर कोणतीही मोठी आपत्ती येत नाही, तोपर्यंत सर्वसामान्य लोक तिथे नवे घर वसवू शकणार नाहीत. इलॉन मस्कप्रमाणेच टेलरही मानतात की, पृथ्वीवर कोणतेही मोठे संकट आल्यास बचावासाठी अंतराळात दुसरे पर्याय असणे खूप गरजेचे आहे.

इलॉन मस्क यांचे म्हणणे आहे की, माणसे २०२८ पर्यंत मंगळावर असू शकतात, मात्र त्यांच्या कालमर्यादा अचूक राहिल्या नाहीत. २०१६ मध्ये त्यांनी २०२४ पर्यंत माणसांना मंगळावर पाठवण्याची गोष्ट सांगितली अंदाज आहे की, २०४५ पर्यंत लाखो लोक अंतराळात होती, जी पूर्ण होऊ शकली नाही. जेफ बेझोस यांचा राहत असतील आणि चंद्रावर कामासाठी रोबोट्स पाठवले जातील. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांचे म्हणणे आहे की, १० वर्षांपेक्षाही कमी वेळात कॉलेज ग्रॅज्युएट्स अंतराळात नवीन, रोमांचक आणि चांगल्या पगाराच्या नोकऱ्या करत असतील. नासाने आर्टेमिस प्रोग्रामअंतर्गत २०२८ च्या अखेरीस होणाऱ्या मानवरहित चंद्र मोहिमांसाठी तीन खाजगी कंपन्यांना सुमारे ५,६४०.४० कोटी रुपयांचे कंत्राट दिले आहे. या तिन्ही कंपन्यांनी २०२४ नंतर चंद्रावर आपले लँडर उतरवण्याचा प्रयत्न केला आहे. फायरफ्लायचे ब्लू घोस्ट लँडर मार्च २०२५ मध्ये चंद्रावर सुरक्षित उतरले. लाँच झाल्यानंतर फेल झाले, तर इंट्युएटिव्ह ॲस्ट्रोबोटिकचे मिशन जानेवारी २०२४ मध्ये मशीन्सचे लँडर २०२४ आणि २०२५ मध्ये लँडिंगदरम्यान उलटले.

## दिनविशेष

२०२२: भारत — भारतातील हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे किमान ५० लोकांचे निधन.

१९९३: — मंगळाच्या शोधमोहिमेतील मार्स ऑब्झर्व्हर या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

१९९१: — लाटव्हिया सोविएत युनियनपासुन स्वतंत्र झाला.

१९११: — पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे मोनालिसा हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.

१८८८: — विल्यम बरोज यांनी बेरजा करणाऱ्या यंत्राचे पेटंट घेतले.

## जन्म

१९८६: उसेन बोल्ट — जमैकाचे धावपटू

१९८१: टायलर विंकलेवॉस — अमेरिकन व्यापारी, ConnectU चे सह-संस्थापक

१९८१: कॅमेरॉन विंकल्वॉस — अमेरिकन व्यापारी, ConnectU चे सह-संस्थापक

१९७३: सर्गेइ ब्रिन — रशियन-अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ आणि व्यापारी, Google चे सह-संस्थापक

१९६३: मोहम्मद (सहावा) — मोरोक्को देशाचे राजा

१९६१: व्ही. बी. चन्द्रशेखर — भारताचे फिरकी गोलंदाज

१९५२: जिरी पारौबेक — झेक प्रजासत्ताक देशाचे ६वे पंतप्रधान, सैनिक आणि राजकारणी

१९४३: पेरी क्रिस्टी — बहामास देशाचे ३रे पंतप्रधान, राजकारणी

१९३९: फेस्टस मोगे — बोत्सवाना देशाचे ३रे अध्यक्ष, बोत्सवाना अर्थशास्त्रज्ञ

१९३७: डोनाल्ड डेवार — स्कॉटलंड देशाचे १ले पहिले मंत्री, स्कॉटिश राजकारणी (निधन: ११ ऑक्टोबर २००० )

१९३७: गुस्तावो नोबोआ — इक्वेडोर देशाचे ५१वे अध्यक्ष, शैक्षणिक आणि राजकारणी (निधन: १६ फेब्रुवारी २०२१ )

१९३४: सुधाकरराव नाईक — महाराष्ट्राचे १३वे मुख्यमंत्री (निधन: १० मे २००१ )

१९२७: बी. सत्य नारायण रेड्डी — भारतीय वकील आणि राजकारणी, पश्चिम बंगालचे १९वे राज्यपाल (निधन: ६ ऑक्टोबर २०१२ )

## मृत्यू

६७२: सम्राट कोबून — जपान देशाचे सम्राट (जन्म: ६४८ )

२००७: एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन — अमेरिकेतील पहिल्या महिला यूएस आर्मी ब्रिगेडियर जनरल (जन्म: ३ नोव्हेंबर १९१८ )

२००६: बिस्मिला खान — महान भारतीय सनईवादक संगीतकार, हिंदुस्थानी संगीताला जागतिक ओळख देणारे कलाकार — भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (जन्म: २१ मार्च १९१६ )

२००५: रॉबर्ट मूग — अमेरिकन उद्योगपती, मूग म्युझिक कंपनीचे संस्थापक (जन्म: २३ मे १९३४

२००५: मार्कस श्मक — फ्रिट्झ विंटरस्टेलर, कर्ट डिमबर्गर, हर्मन बुहल यांच्या सोबत ब्रॉड शिखर पहिल्यांदा चढणारे ऑस्टीयन गिर्यारोहक (जन्म: १८ एप्रिल १९२५ )

२००४: सच्चिदानंद राउत्रे — भारतीय उडिया भाषा कवी (जन्म: १३ मे १९१६ )

२००१: शरद तळवलकर — भारतीय मराठी विनोदी अभिनेते (जन्म: १ नोव्हेंबर १९२१ )

२००१: शं. ना. अंधृटकर — मराठी रंगभूमीचे वारकरी

२०००: निर्मला गांधी — समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२१ ऑगस्ट**

## २०२२ : हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील अतिवृष्टीने घडवला हाहा:कार...

ऑगस्ट २०२२ मध्ये हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या हिमालयीन राज्यांना अतिवृष्टी, ढगफुटी, भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुराचा मोठा तडाखा बसला. मुसळधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले, अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या आणि पुराच्या पाण्याने रस्ते, पूल, घरे आणि इतर पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीत उत्तर भारतात किमान ५० जणांचा मृत्यू झाल्याचे त्यावेळच्या वृत्तांमध्ये नमूद करण्यात आले होते.१९ ऑगस्ट २०२२ पासून हिमाचल प्रदेशात पावसाने रौद्ररूप धारण केले. मंडी, कांगडा आणि चंबा यांसह अनेक भागांमध्ये अचानक पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या. मंडी जिल्ह्यातील काशन गावात भूस्खलनामुळे एक घर ढिगाऱ्याखाली गाडले गेले आणि एकाच कुटुंबातील आठ जणांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देशाला हादरवून सोडले.हिमाचल प्रदेशातील अनेक नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली. रस्त्यांवर पाणी आणि चिखल साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली. अनेक पूल पुराच्या प्रवाहात वाहून गेले. डोंगराळ भागातील भूस्खलनामुळे काही गावांचा संपर्क तुटला. प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणांनी बचावकार्य सुरू केले; मात्र खराब हवामान आणि भौगोलिक परिस्थितीमुळे बचाव पथकांसमोर मोठी आव्हाने निर्माण झाली.उत्तराखंडमध्येही अतिवृष्टीमुळे परिस्थिती गंभीर झाली. डेहराडून जिल्ह्यातील काही भागात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. टिहरी गढवालसह अनेक भागांमध्ये पुराचे पाणी आणि दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि इतर बचाव पथकांनी काम केले.या काळात हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि ओडिशा या राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर व भूस्खलनाच्या घटनांमध्ये तीन दिवसांत किमान ५० जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. हिमाचल प्रदेशात मृतांची संख्या सर्वाधिक होती, तर उत्तराखंडमध्येही अनेक जण मृत्युमुखी पडले आणि काही जण बेपत्ता झाल्याचे सांगण्यात आले.या आपत्तीमागे नैसर्गिक कारणांबरोबरच हिमालयीन प्रदेशाची भौगोलिक रचनाही महत्त्वाची ठरते. डोंगराळ भागात कमी वेळेत मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यास पाण्याचा निचरा वेगाने होतो आणि अचानक पूर येण्याचा धोका वाढतो. त्याचबरोबर भूस्खलनाची शक्यता वाढल्याने रस्ते, पूल आणि वसाहती धोक्यात येतात.या घटनेने हिमालयीन राज्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, हवामानाचा अचूक अंदाज, पूर्वसूचना यंत्रणा आणि सुरक्षित पायाभूत सुविधांची गरज अधोरेखित केली.

# महाराष्ट्राचे १३ वे मुख्यमंत्री : सुधाकरराव नाईक

**जन्मदिन विशेष**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात ग्रामीण भागातून नेतृत्व उभे करणारे, प्रशासनातील शिस्त आणि जलसंधारणाला प्राधान्य देणारे नेते म्हणून सुधाकरराव राजूसिंग नाईक यांचे नाव आदराने घेतले जाते. महाराष्ट्राचे १३ वे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी २५ जून १९९१ ते २२ फेब्रुवारी १९९३ या कालावधीत राज्याची धुरा सांभाळली. त्यांना महाराष्ट्राचे 'जलनायक' म्हणूनही ओळखले जाते.सुधाकरराव नाईक यांचा जन्म २१ ऑगस्ट १९३४ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली येथे झाला. ते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे पुतणे होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या नाईक यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून केली. सरपंच म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण विकासाचा जवळून अनुभव घेतला. पुढे ते विधानसभा सदस्य झाले आणि पुसद मतदारसंघातून अनेक वेळा निवडून आले.राजकारणातील प्रदीर्घ अनुभवामुळे त्यांच्याकडे राज्य सरकारमधील विविध महत्त्वाची खाती सोपविण्यात आली. शिक्षण, महसूल, गृह, उद्योग, ऊर्जा, समाजकल्याण, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि पुनर्वसन अशा विविध विभागांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने, मुलींसाठी वसतिगृहे आणि सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेसारख्या उपक्रमांना चालना दिली. अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीशीही त्यांच्या कार्यकाळाचा संबंध आहे.२५ जून १९९१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुधाकरराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा कार्यकाळ अवघा सुमारे २० महिने असला, तरी या काळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. प्रशासनात शिस्त आणण्यावर त्यांनी भर दिला. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांना चालना देणे, महिला व बालकल्याणासाठी स्वतंत्र



विभागाची निर्मिती आणि नक्षलवादाचा सामना करण्यासाठी पोलिस यंत्रणा बळकट करणे यांसारख्या उपाययोजना त्यांच्या कार्यकाळात झाल्या.मात्र सुधाकरराव नाईक यांच्या राजकीय कारकिर्दीची सर्वाधिक ठळक ओळख म्हणजे जलसंधारणाचे कार्य. महाराष्ट्रातील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे गांभीर्य ओळखून त्यांनी जलसंधारणाला स्वतंत्र महत्त्व दिले. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा विचार त्यांनी जनमानसात रुजवण्याचा प्रयत्न केला. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत पाणी जिरवणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे पुढील काळात महाराष्ट्रातील जलसंधारणाच्या चळवळीला त्यांच्या विचारांचा मोठा आधार मिळाला.त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात महाराष्ट्राला १९९२-९३ मधील मुंबईतील जातीय दंगलींच्या गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागले. या परिस्थितीच्या हाताळणीवरून त्यांच्या सरकारवर मोठी टीका झाली. अखेर २२ फेब्रुवारी १९९३ रोजी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि त्यानंतर शरद पवार पुन्हा मुख्यमंत्री झाले.मुख्यमंत्रीपदानंतरही सुधाकरराव नाईक यांची सार्वजनिक कारकीर्द सुरू राहिली. १९९४ मध्ये त्यांची हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

## शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे सातव्या दिवशीही आंदोलन - जीआर विरोधात संताप




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदींविरोधात सुरू केलेले आंदोलन सातव्या दिवशीही सुरूच ठेवले आहे. विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजा, सुविधा आणि हिताच्या विरोधात हा शासन निर्णय असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी सदर जीआर तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन सुरू करून सात दिवस उलटले असतानाही प्रशासनाकडून अद्याप ठोस दखल घेण्यात आलेली नाही, अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी येऊन विद्यार्थ्यांच्या मागण्या समजून घ्याव्यात आणि त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी के.ए. ग्रुप, अकोले तालुका यांच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी के.ए. ग्रुपचे अध्यक्ष राहुल भाऊ वळे, उपाध्यक्ष वैभव भाऊ गोंदके, संपर्कप्रमुख विजय भाऊ पिचड, कार्याध्यक्ष सुनील भाऊ कोकतरे, शेंडी गाव अध्यक्ष गणेश भाऊ मधे, रिल्स स्टार शरद भाऊ गोडे, फोफसंडी गाव उपाध्यक्ष स्वप्नील भाऊ घोडे, तसेच प्रवीण भाऊ कोंडार, महेश भाऊ गवारी, वैभव भाऊ गोंदके आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

यावेळी के.ए. ग्रुपच्या वतीने प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन संबंधित जीआर रद्द करण्यात यावा; अन्यथा विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ यापेक्षा अधिक व्यापक आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आवाज उठवणार, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणार आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत कटिबद्ध राहणार, असा निर्धार के.ए. ग्रुपचे अध्यक्ष राहुल वळे यांनी व्यक्त केला. आता प्रशासन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल घेऊन कोणती भूमिका घेते याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

## लाडकी बहीण योजनेतील अपात्र कर्मचाऱ्यांकडून वसुली कागदावरच; ९२ लाख महिला यादीबाहेर



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. योजनेचा अपात्रपणे लाभ घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकडून कोट्यवधी रुपयांची वसुली करण्याची घोषणा सरकारने केली असली, तरी प्रत्यक्षात वसुलीची प्रक्रिया अत्यंत संथ असल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे. विशेष म्हणजे, सरकारने विधिमंडळात 'पै-पै वसूल करू' असा दावा केला होता; मात्र अद्याप कोणत्याही जिल्ह्यातून वसुलीचा ठोस अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे.

दरम्यान, पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या १ कोटी ६५ लाख महिलांच्या खात्यावर जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता येत्या आठवडाभरात जमा होणार असल्याची माहिती आहे.

९२.१० लाख लाभार्थी यादीतून वगळले

आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी मिळविलेल्या माहितीनुसार, योजनेच्या सुरुवातीला तब्बल २ कोटी ४८ लाख अर्ज प्राप्त झाले होते. पडताळणी प्रक्रियेनंतर पात्र लाभार्थ्यांची संख्या १ कोटी ६५ लाखांवर आली. त्यामुळे तब्बल ९२ लाख १० हजार महिलांना लाभार्थी यादीतून वगळण्यात आले. यामध्ये सर्वाधिक ६२ लाख महिलांची ई-केवायसी अपूर्ण असल्याने नावे वगळण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील नेटवर्कची समस्या, स्मार्टफोनचा अभाव आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेक महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप आहे. त्यामुळे अशा महिलांसाठी तातडीने ऑफलाइन केवायसीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

मात्र या रकमेची प्रत्यक्ष वसुली किती झाली, याबाबत प्रशासनाकडून अद्याप समाधानकारक माहिती उपलब्ध नसल्याने सरकारच्या वसुलीच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सध्या १.६५ कोटी पात्र महिलांना दरमहा २,४८४.९२ कोटी रुपये वितरित करावे लागत आहेत. त्यामुळे योजनेचा वार्षिक आर्थिक भार तब्बल २९,८१९.१० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. एका बाजूला पात्र महिलांना नियमित हप्ता देण्याची प्रक्रिया सुरू असताना दुसऱ्या बाजूला अपात्र लाभार्थ्यांकडून निधी वसुली रखडल्याचे चित्र आहे.

### अपात्रतेची प्रमुख कारणे

ई–केवायसी अपूर्ण : ६२ लाख
वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा अधिक : १६ लाख
स्वयंघोषणेद्वारे शासकीय कर्मचारी : ४.४२ लाख
संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणारे : २.५० लाख
एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक लाभार्थी : २.५० लाख
इतर दोष व ६५ वर्षांपेक्षा अधिक वय : २.५० लाख
पडताळणीत ओळख पटलेले शासकीय कर्मचारी : ८ हजार
४.५० लाख शासकीय कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ?

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

## उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना महिन्याला २ हजार रुपये - १२ लाख विद्यार्थिनींना लाभ

मुंबई । प्रतिनिधी :

राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी राज्य सरकारकडून मोठा आणि महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. उच्च शिक्षण घेत असताना मुलींना आर्थिक आधार मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे, या उद्देशाने दरमहा २ हजार रुपये 'पॉकेटमनी' देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून हा उपक्रम 'कमवा आणि शिका' या धर्तीवर राबविण्याचा विचार सुरू आहे. यासाठी विद्यापीठे तसेच मोठ्या महाविद्यालयांशी चर्चा करून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीतून विद्यार्थिनींना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी मुंबईतील काही महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांशी मंत्रालयात संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी 'कमवा आणि शिका'च्या धर्तीवर दरमहा २ हजार रुपये उपलब्ध करून देण्यासाठी विभाग प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुलींच्या उच्च शिक्षणाला आर्थिक बळ- उच्च शिक्षण घेताना अनेक विद्यार्थिनींना शिक्षणाचा खर्च, प्रवास, पुस्तके, शैक्षणिक साहित्य आणि दैनंदिन गरजांसाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा विद्यार्थिनींना नियमित आर्थिक मदत मिळाल्यास त्यांना शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल, असा या उपक्रमामागील उद्देश आहे.

सरकारचा हा प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यास राज्यातील सुमारे १२ लाख उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना त्याचा संभाव्य लाभ मिळू शकतो. त्यामुळे मुलींच्या उच्च शिक्षणातील गळती कमी होण्यास आणि शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरमहा २ हजार रुपयांची मदत देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने शासनाकडून सीएसआर निधीचा प्रभावी वापर करण्याचा विचार आहे. यासाठी विद्यापीठे, महाविद्यालये आणि उद्योग क्षेत्रातील संस्थांशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने चर्चा सुरू करण्याची तयारी आहे. मात्र, हा प्रस्ताव सध्या विचाराधीन असून अंतिम निर्णय आणि योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाचा अधिकृत आदेश होणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्षात हा लाभ कधीपासून आणि कोणत्या निकषांनुसार मिळणार, याबाबत शासनाच्या पुढील निर्णयाकडे लक्ष लागले आहे. १२ लाख विद्यार्थिनींना संभाव्य लाभ; उच्च शिक्षणाला आर्थिक पाठबळ देण्याच्या दिशेने राज्य सरकारचे हे पाऊल महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25